सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल

## डॉ. पा. व. चेरियन्

यांचे

# अभिभाषण

७ फेब्रुवारी १९६८

सभापती, अध्यक्ष व सन्माननीय सदस्य,

गेल्या डिसेंबरमध्ये कोयनानगरवर भूकंपाचे संकट कोसळले. त्यानंतर लवकरच आपण या ठिकाणी जमत आहात. या राज्यातील जनतेला निसर्ग जणू काही वारंवार आव्हानच देत असतो असे दिसते. दक्षिण पठाराला भूकंपाचा तडाखा कधीच बसणार नाही अशी आजपर्यंतची समजूत होती. त्यामुळे एवढा जबर धक्का बसेल असे कोणालाही वाटले नाही. या धक्क्यामुळे कोयना-नगरच्या आसपासच्या मोठ्या भागात जीविताची व मालमत्तेची बरीच हानी झाली. विशेषतः सातारा व रत्नागिरी जिल्ह्यांत झालेले नुकसान तर फारच मोठे आहे.

२. तथापि, ज्यांना गंभीर स्वरूपाची हानी पोचली अशा आपदग्रस्तांनी उच्चप्रतीचे मनोधैर्य कायम ठेवले ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. त्या विभागातील सरकारी कर्मचारी आणि विशेषतः कोयना धरण व पोफळी विद्युत केंद्र यांचे प्रभारी अभियंते व अन्य कर्मचारीवर्ग यांनी दाखवलेले धैर्य व कर्तव्यनिष्ठा पाहून मला अत्यंत अभिमान वाटतो. आपदग्रस्त विभागातील आपल्या बांधवांच्या मदतीला या राज्यातील जनता नेहमीप्रमाणे अत्यंत उत्स्फूर्तपणे आणि उदारतेने धावली आहे.

३. पुनर्वसनाचे जे प्रचंड कार्य यानंतर हाती घ्यावयाचे आहे त्याची शासनाला पूर्ण जाणीव आहे. तात्काळ सहाय्य देता यावे म्हणून यापूर्वीच काही तातडीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. कोसळलेल्या किंवा पडझड झालेल्या घरांच्या पुनर्बांधणीसाठी किंवा दुरुस्तीसाठी बांधकामाचे साहित्य पुरविण्याचा एक विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. भूकंपग्रस्त विभाग हा अतिपर्जन्याचा प्रदेश असल्यामुळे तेथे निवाऱ्याची तरतूद करणे ही खरोखरी वेळेशी शर्यतच होय. भूकंपातही टिकाव धरतील अशी घरे बांधण्यासाठी विशेष प्रकारच्या घरांचे नमुने तयार करावे लागतील. आपदग्रस्तांच्या पुनर्वसनाची एकूण जबाबदारी साहजिकच फार मोठी आहे. भारत सरकारचे सहाय्य आणि जनतेचे क्रियाशील सहकार्य व आर्थिक मदत यांच्या बळावरच शासन ही जबाबदारी पेलू शकेल.

४. कोयना धरण आणि पोफळी विद्युत केंद्र व त्याचे संलग्न घटक यांना विशेष गंभीर हानी पोहचली नाही हे सुदैवच म्हटले पाहिजे. वस्तुतः याचे सर्व श्रेय, या बांधकामाचे संकल्प-चित्रण व उभारणी करणाऱ्या अभियांत्रिकी कर्मचारीवर्गाकडेच जाते. धरण व विद्युत केंद्र या दोन्हींची तपासणी देशातील अग्रगण्य अभियंते आणि तंत्रज्ञ यांनी केलेली आहे. संरक्षण व सावधगिरी

यांच्या दृष्टीने अजूनही आवश्यक अशा कोणत्या उपाययोजना करणे जरूर आहे याविषयी सविस्तर पाहणी केली जात आहे. या सर्व उपाययोजना तातडीने अंमलात आणल्या जातील अशी मला खात्री आहे.

५. कृषि उत्पादनाच्या दृष्टीने पाहिल्यास गेल्या सप्टेंबरपर्यंत निसर्गाने आपल्यावर बरीच कृपा केली होती. सप्टेंबरपर्यंत राज्याच्या बहुतांश भागात पाऊस वेळीच आणि योग्य प्रमाणात पडला. त्यानंतर मात्र काही काळ अवर्षणाचा गेला. मागाहून बऱ्याच भागात अकल्पितपणे पाऊस व गारपीट झाली. त्या मागोमाग काही दिवस प्रारंभी सौम्य पण पुढे कडक थंडीची लाट पसरली. या सर्व गोष्टींचा परिणाम कृषि उत्पादनावर झाला. जमिनीचा विकास करणे, पाट-बंधाऱ्यांच्या सोयी वाढवणे आणि संकरित बियाण्यांचा वापर लोकप्रिय करणे या शासनाच्या त्रिविध कार्यक्रमामुळे पिके चांगली येतील अशी जी आमची तोपर्यंत अपेक्षा होती तिला धक्का बसला. या कार्यक्रमाच्या बाबतीतील शासनाच्या प्रयत्नांना जनतेने दिलेला प्रतिसादही उत्साहजनक होता. म्हणून या अल्पकालीन प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येईल अशी शासनाला आशा आहे.

६. उसाबरोबर मिश्र पीक म्हणून संकरित अन्न पिके काढण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाने उसाच्या क्षेत्रात केलेली कपात १९६७–६८ मध्ये रद्द करण्याचे ठरविले. मात्र नवीन लागवडीच्या ऊस क्षेत्रात किंवा खोडव्यात मिश्र पीक म्हणून कालव्याचे पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांनी संकरित ज्वारी व बाजरीचे पीक काढले पाहिजे अशी त्यात अट होती. १९६७–६८ या जलसिंचन वर्षामध्ये खरीप व रबी हंगामांतील अन्न पिकांना आणि सर्व हंगामांतील संकरित पिकांना मोफत पाणी पुरवठ्याची सवलत देखील शासनाने चालू ठेवली.

७. राज्यामध्ये सहकारी क्षेत्रात एक रासायनिक खत कारखाना स्थापन करण्याच्या प्रकल्पाला भाग भांडवल पुरवून मदत करण्याचे शासनाने ठरवले आहे. त्याच क्षेत्रातील मिश्र रासायनिक खत तयार करणाऱ्या छोट्या कारखान्यांना देखील मदत दिली जात आहे.

८. कृषि उत्पादनात वाढ करण्यासाठी एकात्मिक क्षेत्र विकास योजनेचा विस्तार करावा आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये अशाच प्रकारचा एक घटक सुरू करावा असे ठरवण्यात आले आहे. यापूर्वीच दहा पाटबंधारे प्रकल्पांमध्ये प्रायोगिक प्रात्यक्षिक केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

९. कृषि सहकारी संस्थांच्या बरोबरीने मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनाही वित्तसहाय्य देण्यासाठी शासनाने एक नवीन योजना आखली आहे. या योजनेनुसार, मत्स्यव्यवसायाच्या विकासा-साठी जिल्हा सहकारी बँकांना, कमी केलेल्या व्याजाच्या दराने म्हणजे ४·२५ टक्के दराने शिखर बँकेकडून कर्जे मिळतील. त्यामुळे प्रत्यक्ष कर्ज घेणाऱ्यांना त्याच प्रमाणात कमी व्याज पडेल. मच्छीमारी सहकारी संस्थांच्या गटांना होड्या व इंजिने खरेदी करण्यासाठी मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे देखील आता सढळपणे उपलब्ध करून दिली जातील. कृषि पुर्नवित्तव्यवस्था महामंडळाच्या मदतीने रत्नागिरी व ठाणे जिल्ह्यांत शासनाने दोन सहकारी प्रकल्प तयार केले आहेत.

१०. दररोज सुमारे ८,००० कोंबडयांवर संस्करण करता येईल असे एक कुक्कुट संस्करण संयंत्र पुणे येथे पूर्ण होत आले आहे. भारतातील पहिला सूकरमांस कारखाना मुंबईत बोरिवली येथे स्थापन करण्यात येत आहे. या कारखान्यात दररोज सुमारे १०० डुकरांवर संस्करण करता येईल. या दोन्ही प्रकल्पांतून पुढील वर्षी उत्पादन सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

११. ठाणे जिल्ह्यातील दापचरी दूध प्रकल्पाच्या कामाची प्रगती समाधानकारक आहे. १,००० गुरे सामावणारा पहिला विभाग १९६८–६९ मध्ये तयार होईल अशी अपेक्षा आहे.

१२. या वर्षीच्या पिकांचा संपूर्ण अंदाज येईपर्यंत, शासनाला राज्यात वसूल केलेल्या व भारत सरकारकडून मिळालेल्या अन्नधान्यांच्या साठयांचे काळजीपूर्वक जतन केले पाहिजे. उपलब्ध साठयांचे समान वाटप करून व गैरवापराला पायबंद घालूनच हे साध्य होईल. अन्न परिस्थिती बिकट असतांनासुद्धा शिधावाटप पद्धती व्यवस्थित चालवणे शक्य झाले व त्यामुळे ग्रामीण उत्पादन क्षेत्रापासून अधिक क्रयशक्ती असलेला वर्ग वेगळा करता आला, ही आनंदाची गोष्ट आहे. वसुलीचा हंगाम सुरू झाल्यानंतर धान्यवसुलीचे काम सुरळीत सुरू झाले. डिसेंबरच्या दुसऱ्या पंधरवडयात अकाली पडलेल्या जोरदार पावसामुळे मात्र कापणीसाठी जवळजवळ तयार असलेल्या खरीप ज्वारीच्या उभ्या पिकांची नासाडी झाली आणि कापणीची व मळणीची कामे खोळंबून राहिली. परिणामी खरीप ज्वारीच्या वसुलीचे काम काहीसे मागे पडले. असे असले तरी धान्यवसुलीच्या कामाला आता नव्याने चालना मिळेल आणि याबाबतीत गतवर्षीपेक्षा अधिक यश संपादन करता येईल, अशी शासनाला आशा आहे. गेल्या हंगामात एकूण जी भातवसुली झाली तेवढी आतापर्यंत होत आली आहे. या हंगामातील एकूण भातवसुली गतवर्षीपेक्षा जवळजवळ दुप्पट होईल अशी अपेक्षा आहे. भात व संकरित ज्वारी यांसाठी शेतकऱ्यांना द्यावयाचे दर शासनाने वाढवले आहेत.

१३. वाढत्या किंमतींची शासनाला पूर्ण जाणीव आहे ; आणि त्या स्थिर राहाव्यात म्हणून आपल्या उपलब्ध विनियामक शक्तींच्या मर्यादेत शासन शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे. याप्रमाणे महाराष्ट्र गूळ व खांडसरी व्यापारी अनुज्ञापन आदेशाखाली गुळाच्या किंमती नियंत्रित करण्यात शासन यशस्वी झाले आहे. जीवनावश्यक वस्तूंची विक्री वाजवी दराने करण्याच्या उपक्रमात सहकारी भांडारांनी सहभागी व्हावे यासाठी शासनाने सक्रिय उत्तेजनही दिलेले आहे. मोठ्या शहरांमध्ये चार विविध वस्तु भांडारे उघडण्यात आली आहेत आणि इतर ठिकाणी ४२ घाऊक भांडारे असून त्यांच्या ३८५ शाखा आहेत. ग्राम व तालुका स्तरांवरही सुमारे १४०० ग्राहक भांडारे आहेत. त्याखेरीज अन्नधान्ये नियंत्रित भावाने विकण्यासाठी २४,००० दुकाने चालविली जात आहेत. गुजरात शासनाने खाद्य तेलांच्या वाहतुकीवरील निर्बंध उठवावेत आणि त्या शासनाने वसूल केलेल्या खाद्य तेलांच्या व तेलबियांच्या साठ्यांपैकी काही भाग या राज्याला द्यावा अशी आग्रहाची विनंती करण्यात येत आहे.

१४. या वर्षी पिके चांगली येतील अशी अपेक्षा होती, परंतु हंगामाच्या उत्तरार्धातील पावसाच्या लहरीपणामुळे त्यांची फार मोठी नासाडी झाली, याचा उल्लेख मी यापूर्वी केलेलाच आहे. शेतकऱ्यांना पाऊसपाण्यावर सर्वस्वी अवलंबून राहावे लागू नये यासाठी निरनिराळ्या मार्गांनी

पांटबंधाऱ्यांच्या सोयींमध्ये वाढ करण्याचे आपले प्रयत्न शासनाने चालू ठेवले आहेत. चालू वर्षी लहान पाटबंधाऱ्यांच्या योजनांमुळे २१,००० एकर नवीन क्षेत्र पाण्याखाली येईल अशी अपेक्षा आहे. पुढल्या वर्षासाठी हे लक्ष्य ३४,००० एकर ठरवण्यात आले आहे. मोठ्या व मध्यम पाटबंधाऱ्यांच्या बाबतीत हेच लक्ष्य पुढील वर्षाकरिता १.४ लक्ष एकर ठरवण्यात आले आहे. २५० एकरांपर्यंत जमीन भिजविणारी लहान पाटबंधाऱ्यांची कामे आणि ५ लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाची उद्धरण जल-सिंचनाची कामे जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आली आहेत. या कामांसाठी सर्व पैसा शासनाकडून पुरविण्यात येत आहे. चालू असलेली सर्व कामे त्वरेने पूर्ण करता यावीत आणि त्याचप्रमाणे पुष्कळशी नवीन कामे हाती घेता यावीत यासाठी वाढीव नियत रकमा जिल्हा परिषदांच्या स्वाधीन करण्यात येत आहेत. या कामांमुळे आतापर्यंत निर्माण झालेली जलसिंचनक्षमता सुमारे २ लाख एकरांची आहे.

१५. ग्रामीण विद्युतीकरण योजनेची प्रगती समाधानकारक आहे. विदर्भ व मराठवाडा विभागांत वीजपुरवठ्यासंबंधी काही अडचणी आहेत याची शासनाला जाणीव आहे. पारस येथील ३० मे. वॅ. च्या संचाची दुरुस्ती करण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना राज्य वीज मंडळ करीत असून त्याठिकाणी एक नवीन ६२·५ मे. वॅ. चा संच सुरू करण्यात आला आहे. भुसावळ येथील नवीन वीज केंद्राचे कामही आता व्यवस्थित चालू आहे. कळवा-नाशिक मार्गावर वीजवाहक तारा टाकण्यासाठी जारीचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे टाटा-कोयना-रेल्वे ग्रीडमधून आवश्यक तेव्हा वीज मिळू शकेल. तारापूर अणुविद्युत केंद्रातून पुढील वर्षी या राज्याला १९० मे. वॅ. वीज पुरवठा होईल अशी अपेक्षा आहे.

१६. शासनाने विडी व चिरूट कामगार (सेवायोजन शर्ती) अधिनियम, १९६६, १ एप्रिल १९६८ पासून लागू करण्याचे ठरविले आहे. हा अधिनियम विडी उद्योगातील बहुसंख्य कामगारांच्या सेवेच्या शर्ती सुधारण्यास आणि त्यांना योग्य ती वागणूक मिळण्यास साहाय्यभूत होईल.

१७. शिक्षणातील प्रगतीचा वेग यावर्षी कायम राखण्यात आला आणि शैक्षणिक सवलती उपलब्ध करून देण्याच्या बाबतीतील प्रादेशिक असमतोल कमी करण्यावर विशेष भर देण्यात आला. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या कार्यक्रमाकडेसुद्धा योग्य ते लक्ष पुरविण्यात आले. मुंबई व नागपूर विभागांतील ग्रामीण क्षेत्रामधील विशेष बुद्धिमान विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे माध्यमिक शिक्षण मिळावे म्हणून नाशिक आणि चिखलदरा येथे आणखी दोन शासकीय विद्यानिकेतने स्थापन करण्यात आली. शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील वेगवेगळ्या कार्यालयांकडून घेतल्या जाणाऱ्या निरनिराळ्या परीक्षा सुयोग्य अशा शास्त्रीय पायावर चालविण्यासाठी, त्याचप्रमाणे परीक्षा पद्धतीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने मूल्यमापनाची नवीन तंत्रे रूढ करण्यासाठी एक शासकीय परीक्षा मंडळ स्थापन करण्याचे देखील ठरवण्यात आले आहे.

१८. राज्यातील सर्व प्राथमिक शाळांतून एक नवीन एकरूप अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे योजून राज्याच्या निरनिराळ्या विभागांतील प्राथमिक शिक्षणपद्धतीत समानता आणण्याच्या दृष्टीने शासनाने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. प्रारंभी हा अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षापासून पहिल्या इयत्तेत सुरू करण्यात येत आहे. गेल्या वर्षी स्थापन करण्यात आलेले

राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच नवीन अभ्यासक्रमानुसार पहिल्या इयत्तेची दर्जेदार पाठ्यपुस्तके प्रसिद्ध करणार आहे. शाळकरी मुलांना खाद्यपदार्थ पुरविण्याचा एक नवीन कार्यक्रम, केअर या संघटनेच्या सहकार्याने प्रारंभी पुणे, ठाणे व नागपूर या तीन जिल्ह्यांतील निवडक प्राथमिक शाळांतून सुरू करण्यात येत आहे.

१९. वाङमय, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये आणि शिक्षण महाविद्यालये यांमधील अधिव्याख्याते, प्राध्यापक इत्यादींना विद्यापीठ अनुदान आयोग आणि भारत सरकार यांच्या शिफारशीप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या आहेत. जून १९६३ पासून उघडण्यात आलेल्या ज्या खाजगी वाङमय व वाणिज्य महाविद्यालयांना कोणत्याही प्रकारचे अनुदाने मिळत नव्हती त्यांना प्रचलित नियमांखाली अनुदान मिळण्यास आता पात्र समजण्यात आले आहे. महाराष्ट्र ग्रंथालये अधिनियम, १९६६, आपण मंजूर केला आहे. हा अधिनियम प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी आता एक स्वतंत्र ग्रंथालय संचालनालय स्थापन करण्याचे योजिले आहे. कला शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शासनाने अलिकडेच एक पुनर्विलोकन समिती स्थापन केली आहे. कला विषयातील शासकीय उच्चतर परीक्षांच्या पाठ्यक्रमांचे पुनर्विलोकन करणे व त्यांत सुधारणा करणे हे या समितीचे कार्य राहील. तंत्र-शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यमान संस्थांना जादा साधनसामग्री पुरवून व प्रत्यक्ष सोयी उपलब्ध करून देऊन दृढमूल व स्थिर करण्याचे प्रयत्न चालू ठेवण्यात आले आहेत.

२०. लोकांच्या व वैद्यक व्यवसायींच्या प्रतिनिधींना राज्यातील रुग्णालयीन प्रशासनात प्रभावीपणे सहयोगी करावे या हेतूने अध्यापन रुग्णालयांकरिता शासनाने वीक्षक मंडळे स्थापन केली आहेत व त्यांना देखरेखीचे विस्तृत अधिकार दिले आहेत. जिल्हा रुग्णालयासाठी अशाच प्रकारची मंडळे स्थापन करण्याचे योजिले आहे. नागपूर येथील दंत महाविद्यालयाच्या इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षापासून या राज्यातील दुसरे दंत महाविद्यालय सुरू होईल. नांदेड येथे पदवी परीक्षेचा पाठ्यक्रम चालू करता यावा म्हणून तेथील आयुर्वेदिक महाविद्यालयाचा दर्जा वाढवण्यात आला आहे. त्याचप्रमाणे नागपूर येथील आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये प्रगत पाठ्यक्रमाची आवश्यक ती सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तेथील आयुर्वेदिक रुग्णालयाचा देखील विस्तार करण्यात येत आहे.

२१. राज्य कामगार विमा योजनेनुसार विमेदार कामगारांच्या कुटुंबियांना सध्या रुग्णालयीन उपचाराच्या सोयी उपलब्ध होत नाहीत. पुणे आणि नागपूर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या कामगारांच्या कुटुंबियांना एका टप्प्याटप्प्याच्या कार्यक्रमाद्वारा या सोयी उपलब्ध करून देण्याचे योजिले आहे. यावर्षी बृहन्मुंबईतील अशा कुटुंबियांना विशेषज्ञांच्या वैद्यकीय सेवा देखील उपलब्ध करून देण्यात येतील.

२२. कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला दिवसेंदिवस अधिकाधिक चालना मिळत आहे ही समाधानाची गोष्ट आहे आणि जनतेच्या प्रतिसादामुळे जननप्रमाण दर हजारी ४० वरून २५ पर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट १९७६ पर्यंत साध्य होऊ शकेल अशी शासनाला आशा आहे.

२३. महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅटस्‌बाबत अधिनियम, १९६३, हा पुणे व ठाणे नगरपालिकाक्षेत्रांना आणि पुणे व खडकी छावणीक्षेत्रांना लागू करण्यात आला आहे. मालकी हक्काच्या तत्त्वावर फ्लॅटस्‌ची आखणी व बांधणी वगैरे विनियमित करण्याच्या बाबतीत आणि यासंबंधातील गैरव्यवहारांना काही प्रमाणात आळा घालण्याच्या बाबतीत हा अधिनियम उपयुक्त असल्याचे दिसून आले आहे.

२४. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६, हा अमलात आल्यामुळे चांगली प्रगती झाली आहे. आपापल्या प्रदेशासाठी प्रादेशिक योजना तयार करण्यासाठी शासनाने मुंबई, पुणे आणि नागपूर महानगर प्रादेशिक रचना मंडळे स्थापन केली आहेत.

२५. स्थानिक संस्थांना नागरी पाणीपुरवठ्याच्या व जलनिस्सारणाच्या योजना अधिक जलद गतीने पार पाडण्यास मदत व्हावी या दृष्टीने या योजनांसाठी साहाय्य देण्यासंबंधी एक सुधारलेली पद्धती शासनाने मंजूर केली आहे.

ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासंबंधीच्या जिल्हा परिषदांच्या कार्यक्रमासाठी त्यांना वित्तसहाय्य देण्याबाबत शासनाने यापूर्वीच उदार धोरण स्वीकारले आहे. त्या अन्वये परिषदांनी १९,००० विहिरींचे बांधकाम हाती घेतले. यापैकी ८,९०९ विहिरी पूर्ण झाल्या असून ९,५७३ विहिरींचे काम चालू आहे. नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या २१२ योजना हाती घेण्यात आल्या असून त्यांपासून ५९८ गावांना पाणीपुरवठा होणार आहे. यापैकी १९८ गावांना पाणी पुरविणाऱ्या ३९ योजना पूर्ण झाल्या असून ३१७ गावांना पाणी पुरवू शकणाऱ्या ११८ योजनांचे काम चालू आहे.

२६. महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांतील सीमावादाबाबत महाजन आयोगाच्या शिफारशींवरील जनतेच्या भावना आपण गेल्या अधिवेशनात आपल्या ठरावांच्याद्वारे अगोदरच व्यक्त केल्या आहेत. हे ठराव भारत सरकारला व संसदेला कळविण्यात आले आहेत. वादग्रस्त प्रदेशांतील जनतेला संसद आणि भारत सरकार न्याय देतील असा शासनाला पूर्ण विश्वास आहे.

२७. या राज्यातील जनतेच्या चिंतेचा सतत विषय झालेली दुसरी एक आंतरराज्यीय समस्या म्हणजे कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या पाण्याचे न्याय्य व समान वाटप ही होय. सर्व संबंधित राज्यांना रास्त वाटेल अशा काही सयुक्तिक तत्त्वांवर या प्रश्नाची लवकर तडजोड करावी यासाठी शासनाने भारत सरकारला वारंवार आग्रहाची विनंती केली आहे. अशा प्रकारच्या तडजोडीनेच सध्याची अनिश्चितता दूर होईल आणि पाटबंधाऱ्यांच्या कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करणे सोयीचे होईल. निश्चित व रास्त प्रमाणात या पाण्याचे वाटप होत नसल्या-मुळे या राज्याच्या हितसंबंधांना गंभीर धोका निर्माण होत आहे. ही परिस्थिती भारत सरकारच्या निदर्शनास आणली आहे आणि याबाबत सर्वमान्य तोडगा शोधून काढण्यासाठी शासनाने सर्व प्रयत्न केले आहेत. परंतु हे प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळे शासनाला असमाधान वाटते. आतापर्यंत झालेल्या आंतरराज्यीय चर्चेतून उल्लेखनीय असे काहीच निष्पन्न झाले नाही. उलटपक्षी देशाच्या

काही भागांत ज्या काही घटना घडत आहेत त्या या राज्याच्या न्याय्य हक्कांना निश्चितपणे बाधक आहेत. यामुळे शासनाला अधिकाधिक चिंता वाटत आहे. तेव्हा हा प्रश्न एकदा कायमचा निकालात काढला जावा यासाठी एखादे अधिकरण लवकरच नेमण्यात यावे यासाठी हालचाल करणे शासनाला भाग पडेल.

२८. प्रस्तुत अधिवेशन हे मुख्यतः पुढील वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर करण्यासाठी बोलावण्यात आले आहे. या अधिवेशनात पुढील विधेयके मांडण्यात येणार आहेत—

(१) महात्मा फुले वस्तुसंग्रहालय, पुणे, विधेयक.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्थाबाबत अधिनियम, १९६०, यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(३) मुंबई नगर दिवाणी न्यायालय अधिनियमात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१, यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(५) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियमात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(६) महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१, यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(७) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

(८) भारतीय वन अधिनियम, १९२७, हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.

२९. माननीय सदस्य, या अधिवेशनात आपणापुढे बरेच व महत्त्वाचे कामकाज यावयाचे आहे. आपले कामकाज दूरदृष्टीने, उत्साहाने व औचित्याने पार पाडावे ही उदात्त परंपरा आपल्या दोन्ही सभागृहांनी सातत्याने जतन केलेली आहे. आपणही त्या परंपरेला अनुसरून आपले कामकाज पार पाडाल असा मला पूर्ण विश्वास आहे.

● ● ●